# GURURAJ NO.2

## Sahakari Griharachana Sanstha Maryadit

## (Gandharva Nagari)

**Registeration No. PNA/HSG/(TC)/101/92-93 Dated 4th June, 1992**

*** Regd. Address :** Sr. No. 30A/4A, Dahanukar Colony, Kothrud, Pune 411038

**email : gandharvanagari@gmail.com**

**No. :** **Ref. No. :** **Date : / /**

Reference : SGM Notice /Redevelopment / 2023 / April 2023/ 003

**दिनांक : २८/०४/२०२३.**

**<u>विशेष सर्वसाधारण सभेची नोटिस व विषयपत्रिका:-</u>**

प्रति,

माननीय सभासद,

**गुरुराज नं. ०२ सहकारी गृहरचना संस्था मर्यादित, पुणे (गंधर्वनगरी),**

स.नं. ३०अ/०४ अ, डहाणूकर कॉलनी, गल्ली क्रमांक १०,

कोथरूड, पुणे- ४११०३८.

सर्व सन्माननीय सभासद,

आपल्या संस्थेची पुनर्विकास प्रक्रिया सुरू असून त्या अंतर्गत विकसकांकडून मोहरबंद निविदा मागवण्यात आलेल्या होत्या. त्यानुसार प्राप्त झालेल्या निविदांमधून दिलेली ऑफर, विकसकांचे गुणदोष इ. अभ्यास करून तीन विकासकांची अंतिम यादी तयार करण्यात आलेली असून सदर तीन विकसकांमधून अंतिम विकसाकाची निवड, गुप्त मतदान पद्धतीने करण्याची आहे. त्यासाठी संस्थेच्या सभासदांची "विशेष सर्वसाधारण सभा" शनिवार दिनांक १३/०५/२०२३ रोजी दुपारी ०२. ०० वाजता आयोजित करण्यात आलेली आहे. त्यापूर्वी सकाळी १०.०० वाजल्यापासून विकासकांचे सादरीकरण होईल. या दोन्हीही कार्यक्रमास, म्हणजेच सादरीकरण व विशेष सर्वसाधारण सभा यास, आपण सर्वांनी अवश्य उपस्थित रहावे ही नम्र विनंती. सदर सभेपुढे पुढीलप्रमाणे विषय ठेवण्यात आलेला आहे.

**<u>-: विषयपत्रिका :-</u>**

**संस्थेच्या इमारतींच्या पुनर्विकासासाठी प्राप्त निविदांमधून अंतिम यादी तयार केलेल्या तीन विकसकांपैकी एका विकसकाची गुप्त मतदान पद्धतीने निवड करणे.**



Gururaj No.2 Sahakari Griharachana Sanstha Maryadit
Regn. No. PNA/HSG/(TC)/ 101/92-93 Dt. 04/06/1992

**<u>टीप:-</u>**

०१) सकाळी १०.०० ते ०१. ०० या कालावधीमध्ये तिन्ही विकासाचे क्रमाने सादरीकरण होईल तर त्यावेळी प्रत्येक विकसकांना प्रत्यक्ष भेटण्याची आपले प्रश्न विचारण्याची व त्यांच्याशी चर्चा करण्याची सभासदांना मुभा असेल.

०२) विशेष सर्वसाधारण सभेमध्ये फक्त सभासदांनाच उपस्थित राहता येईल व मतदान करता येईल नातेवाईक, मुखत्यारधारक इ. प्रवेश देण्यात येणार नाही.

०३) प्रत्येक सभासदाने सभेस येताना आपले सरकारमान्य असे किमान एक ओळखपत्र बरोबर ठेवणे आवश्यक आहे.

०४) केवळ परदेशात असणाऱ्या सभासदांसाठी झूम प्लॅटफॉर्मवर सभेस उपस्थित राहण्याची मुभा असेल यासाठी सभेची लिंक अशा सभासदांना सभेच्या एक (१) दिवस आधी वैयक्तिकरित्या पाठवण्यात येईल.

०५) सभेस मा. उपनिबंधक सहकारी संस्था पुणे शहर(१) यांचे अधिकृत प्रतिनिधी उपस्थित राहणार असून या पूर्ण सभेचे व्हिडिओ चित्रीकरण करण्यात येणार आहे.

## <u>सभेचा दिनांक, वेळ व ठिकाण:-</u>

**शनिवार, दिनांक १३.०५.२०२३**

**सकाळी १०.०० ते सायंकाळी ५.०० वाजेपर्यंत**

०१) विकसकांचे सादरीकरण- सकाळी १०.०० ते दुपारी १.०० पर्यंत.

०२) विशेष सर्वसाधारण सभा:- विकसक निवड दुपारी २.०० पासून.

**स्थळ:- गांधी भवन, चैतन्य नगर, किर्लोस्कर कमिन्स कंपनीच्या मागे, कोथरूड, पुणे-४११०३८.**

Gururaj No. 2 Sahakari Griharachana Sanstha Maryadit
Regn. No. PNA/HSG/(TC)/ 101/92-93 Dt. 04/06/1992

आपले विश्वासू,

Desai | M.V. Shevde | V.H. Deshpande

**श्री. विक्रमसिंह देसाई** — **अध्यक्ष**

**श्रीमती मृणाल शेवडे** — **सचिव**

**श्री. वैभव देशपांडे** — **खजिनदार**

**<u>विशेष सूचना</u>**

१. विकसकांचे सादरीकरण करण्यासाठी सभा ठीक १०.०० वाजता सुरु होईल व विशेष सर्वसाधारण सभा ठीक ०२.०० वाजता सुरु होईल. त्या सभेस आवश्यक गणसंख्या पूर्ण झाली नाही तर सभा स्थगित केली जाईल. सभेचा कोरम हा संस्थेच्या एकूण सभासद संख्येच्या २/३ इतका आवश्यक राहील. सभेत वरील विषयांवर चर्चा व विचार केला जाईल. तसेच या सभेत घेण्यात आलेले सर्व निर्णय सर्वच सभासदांवर बंधनकारक रहातील याची कृपया सर्वांनी नोंद घ्यावी. सभेस सभासदांनी आवर्जून वेळेवर उपस्थित राहावे हि विनंती.

२. सोसायटीच्या नियमाप्रमाणे सदरहू सभेला फक्त सभासदांनाच सभेच्या कामकाजात भाग घेता येईल. जे सभासद विशेष सर्वसाधारण सभेस उपस्थित राहू शकणार नाहीत व त्यांच्या वतीने घरातील इतर व्यक्ती सभेत उपस्थित राहावयाचे असल्यास त्यांच्याकडील संस्थेने दिलेले सहयोगी सभासदत्वाचे प्रमाणपत्र आधीच सोसायटी ऑफिसमध्ये किंवा ई-मेल द्वारे पाठवणे (gururajno2.gandharva@gmail.com) आवश्यक आहे. सहयोगी सभासद सभेला उपस्थित राहू शकतील. पण त्यांना सभेच्या कामकाजात कोणताही भाग घेता येणार नाही याची नोंद घ्यावी.

३. शासनाच्या अध्यादेशानुसार विशेष सर्वसाधारण सभेच्या कार्यक्रमात जर काही बदल करावे लागले तर त्याची पूर्वसूचना सभासदांना देण्यात येईल.

४. सभासदांच्या काही शंका किंवा सूचना असतील तर त्या दिनांक ०७ मे २०२३ पर्यंत सोसायटीच्या दप्तरी लेखी स्वरूपात किंवा ईमेलवर (gururajno2.gandharva@gmail.com) पाठवाव्यात. आलेल्या लेखी सूचनांचा किंवा शंकांचे निरसन हे विशेष सर्वसाधारण सभेमध्ये तज्ञांमार्फत किंवा पदाधिकाऱ्यांमार्फत केले जाईल. याची सर्व सभासदांनी नोंद घ्यावी.

***

Gururaj No.2 Sahakari Griharachana Sanstha Maryadit
Regn. No. PNA/HSG/(TC)/ 101/92-93 Dt. 04/06/1992